**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर**
**मानधनावर करारबध्द नियुक्ती बाबत**
**(Walk In Interview)**

अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभाग अत्यावश्यक सेवेसाठी मानधनावर करारा नुसार अटी व शर्ती प्रमाणे सहा महिन्याकरीता नियुक्तीसाठी खालील दर्शविलेल्या तात्पुरत्या स्वरुपात पदांवर थेट पध्दतीने उमेदवारांच्या मुलाखती आयोजित करण्यांत येत आहेत.

तरी पात्र उमेदवारांनी शैक्षणिक पात्रता ,अनुभव दाखला व तद्नुषंगिक प्रमाणपत्राच्या सांक्षाकित प्रती जोडलेले अर्ज मा.आयुक्त , अहमदनगर महानगरपालिका , अहमदनगर यांचे नावे करुन अर्जासह दिनांक ३१ / ०५ / २०१६ रोजी सकाळी १०:०० वाजता समक्ष आवश्यक त्या सर्व मुळ कागदपत्रासह मा.आयुक्त कार्यालय ,अहमदनगर महानगरपालिका ,औरंगाबाद रोड येथे थेट पध्दतीने मुलाखतीसाठी उपस्थित रहावे उशिरा आलेल्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व **सदर मानधनावर करारबध्द नियुक्ती बाबतच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे राहतील.**

| अं. क्र. | तात्पुरत्या स्वरुपात पदनाम | विभाग | पद संख्या | आवश्यक शैक्षणिक पात्रता | दर महा मानधन |
|---|---|---|---|---|---|
| १. | विजतंत्री | पाणी पुरवठा | ०५ | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परिक्षा उर्तीर्ण.<br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे वीजतंत्री अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र. | ९,०००/- |
| २ | पंपचालक | पाणी पुरवठा | १० | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परिक्षा उर्तीर्ण.<br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे पंप ऑपरेटर या विषयाचा अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र.<br>क) अनुभवास प्राधान्य. | ९,०००/- |
| ३ | फिटर | पाणी पुरवठा | ०५ | अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक मंडळाची शालांत परिक्षा उर्तीर्ण.<br>ब) शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे नळ कारागीर या विषयाचा अभ्यासक्रम पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र.<br>क) अनुभवास प्राधान्य. | ९,०००/- |

**मानधनावर करारबध्द नियुक्तीसाठी अटी व शर्ती**

१. सदर पदांवर पात्र उमेदवाराची निवड झाल्यानंतर सदरची नियुक्ती पुर्णतः मानधनावर करारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात असल्याने नमुद केलेल्या दरमहा मानधना व्यतिरिक्त निवृत्ती वेतन,विमा योजना, भविष्य निर्वाह निधी तसेच कायम सेवेच्या कोणत्याही प्रकारचे लाभ अनुज्ञेय राहणार नाहीत.

२. उमेदवाराची निवड झाल्यानंतर नेमणूक सेवकाने मानधनावर करारबध्द सेवेसाठी पोलीस प्राधिका-याकडील चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र व मा.जिल्हा शल्य चिकित्सक ,अहमदनगर यांचे कडील सक्षम असले बाबतचे

प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

३. नियुक्ती झालेल्या उमेदवारांचे काम समाधानकारक न आढळल्यास व त्यांचे सेवाविषयक काही तक्रारी उद्भवल्यास पुर्वसूचना न देता दिलेली मानधनावरील करारबध्द नियुक्ती तात्काळ संपुष्टात येईल.

४. शासन सेवा व शर्ती खाली ही नेमणूक नसल्याने निवड झालेल्या उमेदवाराच्या मानधनावरील करारबध्द नियुक्तीचा कालावधी समाप्तीनंतर त्यांना कोणतेही अधिकार राहणार नाहीत.

५. निवड झालेल्या उमेदवाराची नियुक्ती पुर्णत: मानधन तत्वानुसार करारा प्रमाणे अटी व शर्ती नुसार तात्पुरत्या स्वरुपात असल्याने सदर मानधनावरील नियुक्तीचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर सेवेत कायम नियुक्ती होणे बाबत व कायम सेवेचे कुठल्याही प्रकारचे फायदे मिळणे करीता नियुक्ती उमेदवारास मा. न्यायालयात अथवा उच्च न्यायालयात याबाबत दाद मागता येणार नाही . सदरची मुदत संपल्यानंतर सदरचा मानधनावरील करारबध्द नेमणूक आदेश हा अपोआप व्यपगत होईल.

६. निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती मानधनावरील कालावधीमध्ये कार्यालयीन परवानगी शिवाय त्यांना कार्यक्षेत्र सोडता येणार नाही

७. निवड झालेल्या उमेदवारांना सदर कालावधीतील मानधनावरील सेवेचा राजीनामा दयावयाचा असेल तेव्हा मा.आयुक्त,अहमदनगर महानगरपालिका यांचे कडे १५ दिवसाच्या आतं त्यांना याबाबत पुर्व सुचना म्हणुन नोटीस दयावी लागेल.

८. नियुक्ती करीता दिलेली माहिती खोटी असल्याचे निष्पन्न झाल्यास उपरोक्त मानधनावरील करारबध्द नेमणूक तात्काळ रद्द करण्यांत येवून सेवा समाप्त करण्यांत येईल.

९. विवाहीत असल्यास एक पती किंवा एक पत्नी असावे.

१०.महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम०५ मधील प्रतिज्ञा पत्राचा नमुना अ ( नियम ४)अपत्या बाबतचे प्रतिज्ञापत्र करुन दयावे लागेल.

११.तात्पुरत्या स्वरुपात मानधनावरील करारबध्द नियुक्ती कालावधीमध्ये सेवेत हलगर्जीपणा, निष्काळजीपणा व इतर काही त्रुटी उद्भवल्यास त्या बाबतची सर्वस्वी जबाबदारी ही नियुक्त झालेल्या उमेदवारांवर राहील व त्यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यांत येईल.

१२.मुलाखती बाबतचे सर्व अधिकार व हक्क,पदांच्या फेरबदल व अटी व शर्ती बाबतचा अधिकार आणि जाहिराती नुसार पदे भरणे बाबत कोणताही अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांना राहील.कोणताही किंवा सर्व अर्ज काही कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार राखून ठेवीत आहेत.व याबाबत कोणत्याही उमेदवारास त्या बाबत लेखी कळविण्यात येणार नाही.

१३. मानधनावरील करारबध्द नियुक्ती झालेल्या उमेदवारानी सदरचा नियुक्ती आदेश मिळताच ७ दिवसाचे आत पाणी पुरवठा विभागात हजर व्हावे लागेल अन्यथा सदर दिलेला नियुक्ती आदेश तात्काळ संपुष्टात आले बाबत समजण्यात येईल.

१४. सदर मानधनावरील करारबध्द नियुक्त झालेल्या उमेदवारानी वरील सर्व अटी व शर्ती मान्य असल बाबतचे तसे लेखी करारपत्र रु.१००/- च्या मुद्रांकावर मा. जिल्हा दंडाधिकारी , अहमदनगर अथवा त्यांनी अधिकार प्रदान केलेले अधिकारी यांचे समोर साक्षांकीत करुन देणे बंधनकारक आहे.

**मा.आयुक्त यांचे मान्यतेने.**

उप-आयुक्त
तथा सदस्य सचिव निवड समिती
अहमदनगर महानगरपालिका